**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

---

**विषय क्रमांक : ०१** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्र. ०६शुक्रवार दिनांक ०३/०९/२०२१, मा.स्थायी समिती सभा क्र.७ सोमवार दि.२०/०९/२०२१,मा.स्थायी समिती क्र.८ सोमवार दिनांक २५/१०/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.९ सोमवार दि.०१/११/२०२१रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका नगरसचिव विभाग

मा.स्थायी समिती सभा क्र. ०६शुक्रवार दिनांक ०३/०९/२०२१, मा.स्थायी समिती सभा क्र.७ सोमवार दि.२०/०९/२०२१,मा.स्थायी समिती क्र.८ सोमवार दिनांक २५/१०/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.९ सोमवार दि.०१/११/२०२१रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**<u>ऑनलाईन V.C. चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन करा.

मागील सभांचे सभेमध्ये इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.सौ.मिना चव्हाण :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.श्री.परसराम गायकवाड :- इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र. ०६शुक्रवार दिनांक ०३/०९/२०२१, मा.स्थायी समिती सभा क्र.७ सोमवार दि.२०/०९/२०२१,मा.स्थायी समिती क्र.८ सोमवार दिनांक २५/१०/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.९ सोमवार दि.०१/११/२०२१रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांत येत आहे

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र. ०६शुक्रवार दिनांक ०३/०९/२०२१, मा.स्थायी समिती सभा क्र.७ सोमवार दि.२०/०९/२०२१,मा.स्थायी समिती क्र.८ सोमवार दिनांक २५/१०/२०२१,मा.स्थायी समिती सभा क्र.९ सोमवार दि.०१/११/२०२१रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
### मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१

**विषय क्रमांक : ०२** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** ऑनलाईन निविदा क्रमांक ७७६२९७-१/सन २०२१-२२ अंतर्गत अहमदनगर म.न.पा.हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील महात्मा फुले चौक ते भिंगारवाला नाला व भिंगार नाल्यावर पुल बांधणे व रस्ता करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता-मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.२८/०२/२०२२ रोजीची मंजूरी.

२.ऑनलाईन ई - निविदा क्र.७७६२९७-१/सन २०२१-२२दि.०४/०३/२०२२

३.निविदा विक्री कालावधी - दि.०४/०३/२०२२ ते २८/०३/२०२२

४.निविदा स्विकारणेचा कालावधी - दि.०४/०३/२०२२ ते २८/०३/२०२२

५.निविदा उघडण्याचा दिनांक - दि.३०/०३/२०२२

६.कामाची मुदत -४ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल - दि.०७/०४/२०२२ रोजीच्या तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघणेस शिफारस केलेली आहे.त्यानुसार सदरची निविदा उघणेत आलेली आहे.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सां.बा.वि/ई - निविदा क्र.७७६२९७/२०२१-२२ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील महात्मा फुले चौक ते भिंगारवाला नाला व भिंगारनाल्यावर पूल बांधणे व रस्ता करणे | रू.२,१८,३०,१७१/- (GST व्यतिरीक्त) | **मे.ए.पी.सोनीमंडलेचा , अहमदनगर** | **निविदा दरापेक्षा ७.७७% जादा दराने** | **मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर व निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने** |
| | | | **मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर** | **निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने** | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर यांची निविदा,निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने आलेली असून सर्वात कमी दराची भरलेली असल्याने आहे.संबंधित ठेकेदार मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर यांना इकडील पत्र जा.क्र.सां.बां वि.४२ दि.११/०४/२०२२ अन्वये पत्र देवून निविदा दराने काम करण्यास तयार असलेबाबत कळविले .त्यानुसार मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.अहमदनगर दि.११/०४/२०२२ इकडेस पत्र देवून सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत पत्र दिलेले आहे.

तरी सदरचे दर वाजवी असून मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.अहमदनगर यांची निविदा दराची निविदा मंजुरीसाठी मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता अहमदनगर महानगरपालिका यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "अ " प्रमाणे अंदाजपत्रकीय दराची निविदा स्वीकारणेस हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे निविदा दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार सर्वात कमी दराची निविदा ,निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

मा.सभापती साहेब :- ऑनलाईन निविदा क्रमांक ७७६२९७-१/सन २०२१-२२ अंतर्गत अहमदनगर म.न.पा.हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील महात्मा फुले चौक ते भिंगारवाला नाला व भिंगार नाल्यावर पुल बांधणे व रस्ता करणे बाबत ऑफिस रिपोर्ट विषय आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर म.न.पा.हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील महात्मा फुले चौक ते भिंगारवाला नाला व भिंगार नाल्यावर पुल बांधणे व रस्ता करणे बाबत निविदाधारक मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर यांची निविदा,निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने आलेली आहे.त्यांनी पत्र देवून निविदा दराने काम करण्यास तयार असलेबाबत कळविले .त्यानुसार मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.अहमदनगर यांची निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार ऑनलाईन निविदा क्रमांक ७७६२९७-१/सन २०२१-२२ अंतर्गत अहमदनगर म.न.पा.हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील महात्मा फुले चौक ते भिंगारवाला नाला व भिंगार नाल्यावर पुल बांधणे व रस्ता करणे बाबत सर्वात कमी दराचे निविदाधारक मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

**विषय क्रमांक : ०३** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रादेशीक पर्यटन विकास निधी सन २०२१-२२अंतर्गत ऑनलाईन ई - निविदा क्रमांक ७७५५६१ टिळकरोडवरील पुणे एस.टी.स्टॅण्ड ते आनंदऋषीजी समाधी स्थळापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजुने आर.सी.सी.गटर व बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकीय मान्यता-मा.शासन निर्णय क्र.टीडीएस २०२१/प्र.क्र.८४२ /पर्यटन दि.३१/१२/२०२२ रोजीची प्रशासकीय मान्यता.

२.ऑनलाईन ई - निविदा क्र.७७५५६१-१/सन २०२१-२२दि.०३/०३/२०२२

३.निविदा विक्री कालावधी - दि.०३/०३/२०२२ ते २८/०३/२०२२

४.निविदा स्विकारणेचा कालावधी - दि.०३/०३/२०२२ ते २८/०३/२०२२

५.निविदा उघडण्याचा दिनांक - दि.३०/०३/२०२२

६.कामाची मुदत - ४ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल - दि.०७/०४/२०२२ रोजीच्या तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघणेस शिफारस केलेली आहे.त्यानुसार सदरची निविदा उघणेत आलेली आहे.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सां.बा.वि/ई - निविदा क्र.७७५५६१/२०२१-२२ | **टिळकरोडवरील पुणे एस.टी.स्टॅण्ड ते आनंदऋषीजी समाधी स्थळापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजुने आर.सी.सी.गटर करणे** | **रू.४,३९,४७,१८९/-** (GST व्यतिरीक्त) | **मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी अहमदनगर** | **निविदा दरापेक्षा १२.००% जादा दराने** | **मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. अहमदनगर व निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने** |
| | | | **मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर** | **निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने** | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर यांची निविदा,निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने आलेली असून सर्वात कमी दराची भरलेली असल्याने आहे.संबंधित ठेकेदार मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर यांना इकडील पत्र जा.क्र.सां.बां वि.४३ दि.११/०४/२०२२ अन्वये पत्र देवून निविदा दराने काम करण्यास तयार असलेबाबत कळविले .त्यानुसार मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.अहमदनगर दि.११/०४/२०२२ इकडेस पत्र देवून सदरचे काम निविदा दराने करणेस तयार असलेबाबत पत्र दिलेले आहे.

तरी सदरचे दर वाजवी असून मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.अहमदनगर यांची निविदा दराची निविदा मंजुरीसाठी मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता अहमदनगर महानगरपालिका यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "अ " प्रमाणे अंदाजपत्रकीय दराची निविदा स्वीकारणेस हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे निविदा दराची निविदा "अ" नुसार कार्यवाहीस्त सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे निविदा दराची निविदा ,मान्यतेस मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार निवीदा दराची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयार्थ ठेवण्यास सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

मा.सभापती साहेब :- प्रादेशीक पर्यटन विकास निधी सन २०२१-२२अंतर्गत ऑनलाईन ई - निविदा क्रमांक ७७५५६१ टिळकरोडवरील पुणे एस.टी.स्टॅण्ड ते आनंदऋषीजी समाधी स्थळापर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजुने आर.सी.सी.गटर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- प्रादेशीक पर्यटन विकास निधी सन २०२१-२२अंतर्गत ऑनलाईन ई - निविदा क्रमांक ७७५५६१ टिळकरोडवरील पुणे एस.टी.स्टॅण्ड ते आनंदऋषीजी समाधी स्थळापर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजुने आर.सी.सी.गटर करणे बाबत. निविदाधारक मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर यांची निविदा,निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने आलेली आहे.त्यांनी पत्र देवून निविदा दराने काम करण्यास तयार असलेबाबत कळविले .त्यानुसार मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.अहमदनगर यांची निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार ऑनलाईन निविदा क्रमांक ७७५५६१/सन २०२१-२२ अंतर्गत टिळकरोडवरील पुणे एस.टी.स्टॅण्ड ते आनंदऋषीजी समाधी स्थळापर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजुने आर.सी.सी.गटर करणे बाबत. निविदाधारक मोतीलाल धुत इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

**विषय क्रमांक : ०४** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी २०KL क्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे व पाच वर्षा करीता चालविणे व देखभाल दूरूस्ती करणे बाबत केलेल्या कार्यावहीस कार्योत्तर मंजूरीस्तव ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

**संदर्भ:-** १)इकडील जा.क्र.२९१ दि.२७/१२/२०२२ अन्वये प्रस्तावना.
२) मा. सभापती,स्थायी समिती यांचे जा. क्र. ८७ दिनांक ०५/०१/२०२२ रोजीचे पत्र.
३) मा. आयुक्त यांची दिनांक ०६/०१/२०२२ रोजीची मान्यता.
४) मे.जाधव ट्रेडर्स, नाशिक यांचे दिनांक ०७/०१/२०२२ चे पत्र.
५) मे.जाधव ट्रेडर्स, नाशिक यांना इकडील जा.क्र. ३१२ दिनांक ११/०१/२०२२ अन्वये देण्यात आलेला कार्यारंभ आदेश.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.289 या ठिकाणी 20KLक्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे व पाच वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे करीता Tender ID: 2021 _ ANMC_746568_ 1 अन्वये फेर Expression of Interest मागविण्यात आले होते.मनपाचे मालकीचे सावेडी स. नं. 289 या ठिकाणी 20 KL क्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणीचे कामाची आवश्यकता व निकड लक्षात घेता सदरचे काम हे मे.जाधव ट्रेडर्स, नाशिक यांचेकडून करुन घेणेच्या अनुषंगाने वरील नमूद अ.क्र. १ ते ६ करिता मा. स्थायी समिती मान्यता घेणे आवश्यक असल्याने प्रस्ताव मा. स्थायी समितीकडेस सादर करण्यात आला होता.

**त्यानुसार मा. सभापती, स्थायी समिती यांनी खालील प्रमाणे पत्र दिले होते..**

"सध्या कोविड-१९ व ओमायक्रॉन या विषाणुमुळे संपुर्ण देशासह महाराष्ट्र व जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रार्दुभाव वाढत असल्याने दिवसेंदिवस रुग्ण संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यामुळे कोरोना कोविड -१९ व ओमायक्रॉन बाधीत रुग्णांची तीसरीलाट येण्याची शक्यता सर्व वर्तमानपत्रे व इलेक्ट्रॅनिक्स मेडीया,टि.व्ही. वरील बातम्यांव्दारे वर्तविण्यात येवून जनतेस सतर्क रहाण्याचे अवाहन करण्यात येत आहे. मा. महाराष्ट्र शासनाने सुध्दा ब-याच ठिकाणी गर्दी टाळणे करीता र्निबंध घातले आहेत. या गोष्टींचा विचार करता प्रस्तावित सदर 20 KL क्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणी तातडीचे झालेले आहे.

तरी सदरच्या प्रस्तावास आपल्या स्तरावर मे.जाधव ट्रेडर्स, नाशिक यांना कार्यारंभ आदेश देण्यास व प्रकल्प तातडीने सुरु करणे बाबत आदेश देण्यात यावेत. तसेच आपण केलेल्या कार्यवाही बाबत मा. स्थायी समितीकडे कार्योत्तर मंजूरीस्तव पाठविण्यात यावे. असे नमुद करण्यात आले होते."

विषयांकित काम हे मे.जाधव ट्रेडर्स, नाशिक यांचेकडून करुन घेणेसाठी मा. सभापती महोदय यांचे पत्रानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ मधील कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त यांचे मान्यता घेवून मे.जाधव ट्रेडर्स, नाशिक यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सदरचे काम सद्यस्थितीत सुरु करणेत आले असून **PESO** या संस्थेकडून परवानगी साठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

करिता सावेडी स. नं. 289 या ठिकाणी 20 KL क्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणीचे कामे खालील प्रमाणे ठरवून दिले कार्यारंभ आदेश व सर्व खर्चासाठी मा. स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी कामी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

१.सोबतच्या तक्त्यातील बाब क्र. १,२,३,४,६ व ७ ही प्रकल्प उभारणी बाबत असून वाटाघाटी अंती सदरचे काम हे रक्कम रु. १,१०,००,०००/- मध्ये करणेचे ठरले आहे.

२.सोबतच्या तक्त्यामधील अ क्र. ५ चे काम रद्द करणे व ठेकेदार एजन्सी मार्फत **Micro Cyle (Dura)** भरणेसाठी एक पॉईंट विनाशुल्क करुन देण्याचे एजन्सीने मान्य केले आहे.

३.अ. क.८ मधील बाब ही ४ वर्षाकरीता देखभाल दुरुस्तीची आहे. ही बाब प्रकल्प कार्यान्वित झालेनंतर ४ वर्षाकरीता आवश्यकतेनुसार राबवायची आहे व यासाठी येणारा खर्च त्या- त्या वेळी करावयाचा आहे.

४.अ. क्र. ९ मधील ही बाब प्रकल्प उभारणीच्या निगडीत नाही परंतु प्रकल्प कार्यान्वित झालेनंतर ५ वर्षाकरीता चालविणेत येणार आहे. त्यासाठीचे शुल्क त्या-त्या वेळी अदा करणेत येईल.

५.अ. क्र. १० मधील नमूद Liquid Medical Oxygen पुरविणेसाठी रु.४१.५०/- ऐवजी ३५.००/- प्रति क्यु. मीटर प्रमाणे पुरवठा करणेस तयार असुन या कामाचे देयक मनपास प्राप्त झाल्यानंतर अदा करणेत येईल.

६.अ. क्र. ११ मधील बाब ही स्थापत्य कामाशी निगडीत आहे. सदरचे काम मे.जाधव ट्रेडर्स, नाशिक यांचेकडूनच करावयाचे आहे. या कामासाठी **PESO** या संस्थेच्या आवश्यकतेनुसार चालु दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमाप घेवुन अंदाजपत्रकातील दरांच्या ५% जादा दराने स्थापत्य कामे करणेत येणार आहेत.

तसेच 20 KL क्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे कामी स्थापत्य काम करावयाचे आहेच, परंतु भविष्यात प्रकल्पाची क्षमता वाढविता यावी यासाठी एक अतिरिक्त (Stand by) Pedestal करुन ठेवणे योग्य राहील. यासाठी काही अतिरिक्त खर्च येईल. याची मान्यता घेणे आवश्यक राहील.

| **अ.न** | **निविदा मजुर रक्कम** | **काम पुर्ण करण्याचा कालावधी** |
|---|---|---|
| १ | १.प्रकल्प उभारणे - रु. १.१० कोटी.<br>२.स्थापत्य कामे करणे -रु.०.४ कोटी. (अंदाजे) (चालू दरसुचीतील दरांच्या ५%<br>जादा दराने )<br>पाच वर्षाकरीता प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे<br>**३. CAMC For 5 Years - रु. २५,७०,०४०/-**<br>४. O & M - **रु. ४३,६१,२८०/-** | २ महिने<br><br><br>५ वर्ष |

करीता वरील प्रमाणे केलेली कार्यवाही व येणा-या संपुर्ण खर्चासाठी मा.स्थायी समितीकडेस कार्योत्तर मंजुरीस्तव सादर करणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता ,प्रकल्प विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेसाठी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी २०KL क्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे व पाच वर्षा करीता चालविणे व देखभाल दूरूस्ती करणे बाबत केलेल्या कार्यावहीस कार्योत्तर मंजूरीस्तव ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबतची माहिती सांगा.

मा.उपायुक्त (कर)श्री.डांगे :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.289 या ठिकाणी 20KLक्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे व पाच वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे करीता करीता टेंडर मागविण्यात आले होते.या मध्ये मे.जाधव ट्रेडर नाशिक यांच्या कमी दराची निविदा प्राप्त झाली होती.संभाव्य कोवीड -१९ तीस-या लाटेची शक्यता असल्याने तत्कालीन मा.सभापती साहेब यांनी संभाव्य परिस्थीतीचा विचार करून मे.जाधव ट्रेडर्स नाशिक यांना कार्यारंभ आदेश देण्यास व प्रकल्प तातडीने सुरू करणे बाबत मा.आयुक्त साहेब यांना पत्र दिले.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अधिनियम क्र.५९ मधिल कलम ६७ (३) क अन्वये मा.आयुक्त साहेब यांची मान्यता घेवून सदर संस्थेस कार्यारंभ आदेश देण्यात आला.सदर बाबत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरीस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे सादर करण्यात आला आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- कार्योत्तर मंजूरी कोणकोणत्या कामा करीता दयावयाची आहे.

मा.उपायुक्त (कर)श्री.डांगे :- प्रकल्प उभारणे ,.स्थापत्य कामे करणे , पाच वर्षाकरीता प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे .

मा.श्री.गणेश कवडे :- प्रकल्प उभारणी नंतर पाच वर्षा करीता प्रकल्प चालवीण्यास देणे योग्य वाटत नाही.यावर विचार करावा.एका वर्षा करीता चालवण्यास देणे योग्य राहिल.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सध्या कोवीड-१९ ची लाट ओसरली आहे.त्यामुळे एक वर्ष प्रकल्प चालविण्यास देवून नंतर टेंडर काढून चालविण्यास देता येईल.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- सध्या रूग्णसंध्या घटली असल्याने आपल्याला याची आवश्यकता नाही.त्यामुळे सर्व शक्यता पडताळून आपल्याला प्रकल्प सुरू झाल्यानंतर एक वर्ष चालविण्यास देवून नंतर टेंडर काढून खाजगी दवाखान्यांकरीता ऑक्सीजन पुरविण्यात येईल.

मा.उपायुक्त (कर)श्री.डांगे :- मा.शासनाच्या निर्देशानुसार आपण 20KLक्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे आवश्यक असल्याने आपण करारनामा करून वर्क ऑर्डर दिलेली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- प्रकल्प पाच वर्ष चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे करीता मोठया प्रमाणात खर्च होणार आहे.त्यापेक्षा जर प्रकल्प एक वर्षा करीता चालविण्यास दिला व आवश्यकतेनुसार पुढील टेंडर प्रक्रीया करता येईल .असे केल्यास होणारा खर्च कमी होणार असून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे.

मा.उपायुक्त (कर)श्री.डांगे :- सदरचा विषय कार्योत्तर मंजूरीचा आहे.त्यामुळे प्रकल्प चालविण्यास देणे व देखभाल दुरूस्ती सह देण्यात आलेल्या कार्यारंभा नुसार मान्यता दयावी लागणार आहे.

मा.सभापती साहेब :- सध्या तर आपल्याला ऑक्सीजन ची जादा गरज नाही.हा प्रकल्प कार्यान्वीत रहाण्या करीता जर आपण खाजगी हॉस्पीटल करीता ना नफा ना तोटा या तत्वावर ऑक्सीजन पुरवठा केला तर प्रकल्प सुरू राहील व महानगरपालिकेचा एक चांगला उपक्रम होईल.जनमानसात महानगरपालिकेची प्रतीमा उजळणार आहे व आपल्याला सुध्दा एक चांगले काम करण्याचे समाधान होईल.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.289 या ठिकाणी 20KLक्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे व पाच वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.गणेश कवडे :- प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर ऑक्सीजन वितरण करण्या करीता निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी २०KL क्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे व पाच वर्षा करीता चालविणे व देखभाल दूरूस्ती करणे बाबत केलेल्या कार्यावहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.प्रकल्प सुरळीत चालू रहाण्या करीता, प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर उपलब्ध होणारा ऑक्सीजन वितरण करण्या करीता निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी २०KL क्षमतेचा Liquid Medical Oxygen Tank उभारणे व पाच वर्षा करीता चालविणे व देखभाल दूरूस्ती करणे बाबत केलेल्या कार्यावहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.प्रकल्प सुरळीत चालू रहाण्या करीता, प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर उपलब्ध होणारा ऑक्सीजन वितरण करण्या करीता निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

---

**विषय क्रमांक : ०५** **दिनांक :- १८/०४/२०२२**

-----------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभाग,प्रभाग समिती क्रं.१ ढवणवस्ती परिसर, तपोवन हाडको,तपोवन परिसर, कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यंत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

**संदर्भ :-** १.ई निविदा क्र.७५६४६० -१ दि.१२/०१/२०२२

२.दिनांक ३१/०१/२०२२ चा स्क्रीन शॉट

३.इकडील जा.क्र.पा.पु.१३५९ दि.११/०२/२०२२ अन्वये पत्र

४.मे.ओम साई कन्स्ट्रक्शन यांचे दि.१५/०२/२०२२ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की,ढवणवस्ती परिसर ,तपोवन हडको,तपोवन परिसर,कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यत २०० एम.एम.व्यासाची ती परिसर ते नाना चौक पर्यत २०० एम.एम.व्यासाची या कामाची ई निविदा क्र. ७५६४६० -१ दि.१२/०१/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. दि.३१/०१/२०२२ रोजी सदर निविदेचा स्क्रीन शॉट पाहिला असता त्याकरिता २ निविदा प्राप्त झाले असून सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा दि.०२/०२/२०२२ रोजी उघडला असता १.ओम साई कन्स्ट्रक्शन,अहमदनगर २.एस.एफ.शेख, अहमदनगर या दोन निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

त्या अनुषंगाने निविदाधारक यांची निविदेचा दि.०२/०२/२०२२ रोजी आर्थिक लिफाफा उघडण्यात आला असता१. ओम साई कन्स्ट्रक्शन,अहमदनग २.एस.एफ.शेख,अहमदनगर यांचे दर खालीलप्रमाणे प्राप्त झाले.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदा रक्कम | प्राप्त दर |
|---|---|---|---|
| १ | ओम साई कन्स्ट्रक्शन | रू.३१,३१,१९९/- | ७.००%जादा दराने म्हणजेच रू३३,५०,३८३/- |
| २ | .एस.एफ.शेख | रू.३१,३१,१९९ | ९.९९%जादा दराने म्हणजेच रू.३३,४४,००६/- |

या अनुषंगाने कमीचे निविधारक श्री.ओम साई कन्स्ट्रक्शन यांचेशी दि.१४/०२/२०२२ रोजी वाटाघाटी झाली असता संदर्भ क्र.५ अन्वये सदरचे कामास चालू दरसुची सन २०२१-२०२२ च्या दराने काम करण्यास तयारअसले बाबत कळविले आहे.सदर अंदाजपत्रकाचे चालू दरसूची सन २०२१-२०२२ नुसार अंदाजपत्रक केले असता या अंदाजपत्रकाची किंमत ३२,६२,९९९/- इतकी येत आहे.सदरची रक्कम ही निविदा रकमेच्या ४.०४% जादा आहे.वाटाघाटी दरम्यान ठेकेदाराने कळविल्यानुसार सदरचे काम चालू दरसूची म्हणजेच रू.३२,६२,९९९/- या प्रमाणे करण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

करिता विषयांकीत कामासाठी मे.ओम साई कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार सन २०२१-२०२२ चे दरसुचीतील दराप्रमाणे म्हणजेच रू.३२,६२,९९९/- च्या प्रशासकीय मंजूरीचे अधिकार मा.स्थायी समितीस असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.जल अभियंता यांचा अभिप्राय की,अहवालानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे सन २०२१-२२च्या निविदा दराने निविदा दराची निविदा "अ" नुसार कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,स्थायी कडे मान्यतेस्तव

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभाग,प्रभाग समिती क्रं.१ ढवणवस्ती परिसर, तपोवन हाडको,तपोवन परिसर, कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यंत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे बाबत ऑफीस रिपोर्ट आहे.

मा.सौ.मिना चव्हाणः- माझ्या प्रभागामध्ये पाण्याची समस्या आहे.पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे.नागरीक रोज फोन करतात.या कामाचा तात्काळ कार्यारंभ आदेश देवून काम सुरू करण्यात यावे.सध्या उन्हाळयाचे दिवस आहेत.नागरीकांचे पाण्यासाठी मोठया प्रमाणत हाल होत आहे.सदरचा विषय मार्गी लागण्यात करीता विरोधी पक्ष नेते मा.श्री.संपतदादा बारस्कर यांनी अथक प्रयत्न केले असल्याने आज हा विषय मा.स्थायी समितीच्या मंजूरी करीता आलेला आहे.

मा.सभापती साहेब :- स्थायी समिती सदस्या मा.सौ.मिनाताई यांनी मांडलेल्या नागरीकांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने सदर ठराव विभागाकडे प्रप्त झाल्यानंतर तात्काळ कार्यारंभ आदेश देवून काम तात्काळ सुरू करावे.

जल अभियंता श्री.निकम :- पाईप लाईन टाकण्याचे काम झाल्या नंतर हा प्रश्न मार्गी लागणार आहे.

मा.श्री.परसराम गायकवाडः- मुख्य अभियंता,म.जी.प्रा.प्रादेशिक विभाग, पुणे यांनी जा.क्र./मु.अ.(पुणे) / चिशा/ दरसुची २०२१-२२ / शुध्दीपत्रक क्र.७/६५२ दिनांक ०७/०३/२०२२ सुधारीत दरा नुसार मान्यता देण्यात यावी.

मा.सौ.मिना चव्हाण :- म.जि.प्रा.यांचे कडील शुध्दीपत्रक विचारात घेवून मान्यता देण्यात यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभाग,प्रभाग समिती क्रं.१,ई निविदा क्र. ७५६४६० -१ दि.१२/०१/२०२२ ढवणवस्ती परिसर, तपोवन हाडको,तपोवन परिसर, कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यंत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे बाबत निविधारक श्री.ओम साई कन्स्ट्रक्शन यांचेशी वाटाघाटी अंती सन २०२१-२०२२ च्या सुधारीत दरसुची नुसार येणारी रक्कम रू.३२,६२,९९९/- चे दरास मान्यता देणे बाबत ऑफिस रिपोर्ट सादर करण्यात आलेला आहे.मात्र ठेकेदार मे.ओमसाई कन्स्ट्रक्शन अ.नगर यांनी माझ्या कडे पत्र देवून मा.शासनाकडून सन २०२१-२०२२ चे दरसुची पुनश्च सुधारीत करण्यात आलेली आहे व या बाबत मुख्य अभियंता,म.जी.प्रा.प्रादेशिक विभाग, पुणे यांनी जा.क्र./मु.अ.(पुणे) / चिशा/ दरसुची २०२१-२२ / शुध्दीपत्रक क्र.७/६५२ दिनांक ०७/०३/२०२२ अन्वये शुध्दीपत्रक सर्व संबंधितांना दिलेले आहे. त्यानुसार शुध्दीपत्रकानुसार सदरची निविदा ही सुधारीत दरानुसार मंजूर करावी अशी विनंती केली आहे. त्यामुळे सदर शुध्दीपत्रकानुसार रितसर वाढ होत असल्यास त्याप्रमाणे वाढीसह या कामाच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभाग,प्रभाग समिती क्रं.१,ई निविदा क्र. ७५६४६० -१ दि.१२/०१/२०२२ ढवणवस्ती परिसर, तपोवन हाडको,तपोवन परिसर, कसबे वस्ती परिसर ते नाना चौक पर्यंत २०० एम.एम.व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे बाबत निविधारक श्री.ओम साई कन्स्ट्रक्शन यांचेशी वाटाघाटी अंती सन २०२१-२०२२ च्या सुधारीत दरसुची नुसार येणारी रक्कम रू.३२,६२,९९९/- चे दरास मान्यता देणे बाबत ऑफिस रिपोर्ट सादर करण्यात आलेला आहे.मात्र मा.शासनाकडून सन २०२१-२०२२ चे दरसुची पुनश्च सुधारीत करण्यात आलेली आहे व या बाबत मुख्य अभियंता,म.जी.प्रा.प्रादेशिक विभाग, पुणे यांनी जा.क्र./मु.अ.(पुणे) / चिशा/ दरसुची २०२१-२२ / शुध्दीपत्रक क्र.७/६५२ दिनांक ०७/०३/२०२२ अन्वये शुध्दीपत्रक सर्व संबंधितांना दिलेले आहे.त्यामुळे सदर शुध्दीपत्रकानुसार रितसर वाढ होतअसल्यास त्याप्रमाणे वाढीसह या कामाच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

---

**विषय क्रमांक : ०६** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**-प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका, प्रकल्प विभाग, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स.न.३४ या ठिकाणी २० KL क्षमतेचा लिचेट टिट्रिमेंट प्लॅटं विकसित करणे व दोन वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत करीता Tender ID-२०२२-ANMC-७५५०३३-१ अन्वये फेर Exprssion of Interest च्या अनुषंगाने Global Enviros Mumbai यांचेकडील प्राप्त दरासाठी ऑफीस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

संदर्भः- १) इकडील जा..क्र. ४१७ दिनांक ०२/०३/२०२२ चे पत्र

२) दिनांक ०३/०३/२०२२ रोजीची वाटाघाटी.

३) Global Enviros, Mumbai यांचे दि. ०३/०३/२०२२ रोजीचा ई-मेल.

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी २० KL क्षमतेचा लिचेट ट्रिटमेंट प्लॅट विकसीत करणे व दोन वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत करीता Tender ID_2022_ ANMC_ 755033_1अन्वये फेर Expression of Interest मागविण्यात आले होते.

त्यानुसार Global Enviros, Mumbai यांनी सदर Expression of Interest मधील तांत्रिक लिफाफ्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने मा. आयुक्त यांचे मंजुरीने त्यांचा व्यापारी लिफाफा दिनांक २४/०२/२०२२ रोजी उघडण्यात आला तो खालील प्रमाणे .

**ESTIMATE AND O & M CHARGES**

| Sr. No. | Equipment Details | Qty. | Rate Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| | **A. Civil Units** | | | |
| 1. | Bar Screen Chamber | 1No. | 687772 | 687772 |
| 2. | O & G Trap | 1No. | | |
| 3. | Collection / Equa. Tank | 1No. | | |
| 4. | Holding Tank | 1No. | | |
| 5. | Sludge Drying Beds | 3Nos. | | |
| 6. | Equip. Foundations | 1Lot | | |
| | | | **Total - A** | **687772** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **B. Mechanical Equipment** | | | | |
| 1. | Bar Screen | 1No. | 15000 | 15000 |
| 2. | Anaerobic Reactor | 1No. | 536935 | 536935 |
| 3. | Aeration Tank | 1No. | 495096 | 495096 |
| 4. | Secondary Tube Settler | 1No. | 240146 | 240146 |
| 5. | Anaerobic Tank Media | 1Lot | 255000 | 255000 |
| 6. | Raw effluent Transfer Pumps | 2Nos. | 35000 | 70000 |
| 7. | Diffused Aeration System | 10Nos. | 14000 | 140000 |
| 8. | Tube Settler Media | $2.25M^{3.}$ | 55000 | 55000 |
| 9. | Sludge Recycle Pumps | 2Nos. | 35000 | 70000 |
| 10. | Filter Feed Pumps | 2Nos. | 30000 | 60000 |
| 11. | Pressure Sand Filter | 1No. | 50000 | 50000 |
| 12. | Activated Carbon Filter | 1No. | 57500 | 57500 |
| 13. | Chlorine Dosing System with Pump & Tank | 1No. | 20500 | 20500 |
| 14. | Twin Lobe Air Blowers | 2Nos. | 105000 | 210000 |
| | | | **Total - B** | **2275177** |
| **C. Piping and Fittings within Battery limits** | | | | |
| 1. | Inter connecting Piping / Fittings within battery limit | Lot. | 75000 | 75000 |
| 2. | Valves - Ball valves – PP, Butterfly | Lot. | 35000 | 35000 |
| 3. | MCC Panel with Electrical, internal cabling, starters & push button stations, earthing pit, etc. complete | Lot | 275000 | 275000 |
| 4. | Fabrication of Railing, Platform and Ladders | LS | 125000 | 125000 |
| 5. | Transport Charges | LS | 75000 | 75000 |
| 6. | Erection and Commissioning | LS | 75000 | 75000 |
| 7. | To get MPCB Authorization | LS | 300000 | 300000 |
| 8. | Operations and Maintenance for 2 year | 24 Months | 90000 | 2160000 |
| | | | **Total - C** | **3120000** |
| | | | **Total (A+B+C)** | **6082949** |
| | | | **GST @18%** | **1094930.82** |
| | | | **Grand Total** | **7177879.82** |
| **(Rupees Seventy One Lakhs Seventy Seven Thousand Eight Hundred Seventy Nine and Paise Eighty Two Only)** | | | | |

वरील प्रमाणे दर पहाता सदरचे दर अवाजवी असल्याने Global Enviros, Mumbai यांना दिनांक ०३/०३/२०२२ रोजी मा. उपायुक्त (कर ) यांचेकडेस वाटाघाटी साठी बोलविण्यात आले. त्यानुसार Global Enviros, Mumbai यांनी वाटाघाटी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार खालील दरा प्रमाणे काम करण्यास तयार असले बाबत पत्र दिले आहे. सदरचे पत्र सोबत सलग्न करणेत आले आहे.

**FINAL OFFER AS NEGOTIATED ON 03.03.2022 FOR 20KLD LTP**

| Sr. No. | Equipment Details | Qty. | Rate Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| | **A. Civil Units** | | | |
| 1. | Bar Screen Chamber | 1No. | 6,87,772.00 | 6,87,772.00 |
| 2. | O & G Trap | 1No. | | |
| 3. | Collection / Equa. Tank | 1No. | | |
| 4. | Holding Tank | 1No. | | |
| 5. | Sludge Drying Beds | 3Nos. | | |
| 6. | Equip. Foundations | Lot | | |
| | | | **Total - A** | **6,87,772.00** |
| | **B. Mechanical Equipment** | | | |
| 1. | Bar Screen | 1No. | 15,000.00 | 15,000.00 |
| 2. | Anaerobic Reactor | 1No. | 5,36,935.00 | 5,36,935.00 |
| 3. | Aeration Tank | 1No. | 4,95,096.00 | 4,95,096.00 |
| 4. | Secondary Tube Settler | 1No. | 2,40,146.00 | 2,40,146.00 |
| 5. | Anaerobic Tank Media | Lot | 2,55,000.00 | 2,55,000.00 |
| 6. | Raw effluent Transfer Pumps | 2Nos. | 35,000.00 | 70,000.00 |
| 7. | Diffused Aeration System | 10Nos. | 14,000.00 | 1,40,000.00 |
| 8. | Tube Settler Media | Lot | 55,000.00 | 55,000.00 |
| 9. | Sludge Recycle Pumps | 2Nos. | 35,000.00 | 70,000.00 |
| 10. | Filter Feed Pumps | 2Nos. | 30,000.00 | 60,000.00 |
| 11. | Pressure Sand Filter | 1No. | 50,000.00 | 50,000.00 |
| 12. | Activated Carbon Filter | 1No. | 57,500.00 | 57,500.00 |
| 13. | Chlorine Dosing System with Pump & Tank | 1No. | 20,500.00 | 20,500.00 |
| 14. | Twin Lobe Air Blowers | 2Nos. | 1,05,000.00 | 2,10,000.00 |
| | | | **Total - B** | **22,75,177.00** |
| | **C. Piping and Fittings within Battery limits** | | | |
| 1. | Inter connecting Piping / Fittings within battery limit | Lot | 75,000.00 | 75,000.00 |
| 2. | Valves - Ball valves – PP, Butterfly | Lot | 35,000.00 | 35,000.00 |
| 3. | MCC Panel with Electrical, internal cabling, starters & push button stations, earthing pit, etc. complete | Lot | 2,75,000.00 | 2,75,000.00 |
| 4. | Fabrication of Railing, Platform and Ladders | LS | 1,25,000.00 | 1,25,000.00 |
| 5. | Transport Charges | LS | 75,000.00 | 75,000.00 |
| 6. | Erection and Commissioning | LS | 75,000.00 | 75,000.00 |
| 7. | To get MPCB Authorization | LS | 3,00,000.00 | 3,00,000.00 |
| 8. | Operations and Maintenance for 2 year | 24 Months | 90,000.00 | 21,60,000.00 |
| | | | **Total - C** | **31,20,000.00** |
| | | | **Total (A+B+C)** | **60,82,949.00** |
| | | | **Discount given during the negotiations on 03.03.2022** | **82,949.00** |
| | | | **Amount after negotiation** | **60,00,000.00** |
| | | | **GST @18%** | **10,80,000.00** |
| | | | **Grand Total** | **70,80,000.00** |
| | **(Rupees Seventy Lakhs Eighty Thousand Only)** | | | |

करिता अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी २० KL क्षमतेचा लिचेट ट्रिटमेंट प्लॅट विकसीत करणे व दोन वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत Global Enviros, Mumbai यांनी वाटाघाटी नंतर नमुद केलेल्या दरास मान्यतेचे अधिकार

मा. स्थायी समितीस असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता ,प्रकल्प विभाग यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,शाखा अभियंता व मु.ले.अ.यांचे प्रस्तावानुसार "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका, प्रकल्प विभाग, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स.न.३४ या ठिकाणी २० KL क्षमतेचा लिचेट टिट्रिमेंट प्लॅटं विकसित करणे व दोन वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत करीता Tender ID-२०२२-ANMC-७५५०३३-१ अन्वये फेर Exprssion of Interest च्या अनुषंगाने Global Enviros Mumbai यांचेकडील प्राप्त दरासाठी ऑफीस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- सविस्तर माहिती सांगा.

उपायुक्त श्री.डांगे :- पावसामुळे कचरा ओला होते.हे पाणी जमीनीमध्ये मुरते.त्यामुळे आजुबाजुच्या जमिनीमधील पाणी दुषीत होते.या कच-यातुन पाणी काढण्याची प्रक्रिया करण्याचा हा प्रकल्प आहे.

मा.श्री.समद खान :- महानगरपालिकेचा स्टाफ अपुरा असल्याने या संस्थेस तीन वर्षाची मुदत वाढ देण्यात यावी.

मा.श्री.गणेश कवडे :- प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे करीता याच संस्थेला पाच वर्षा करीता देण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका, प्रकल्प विभाग, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स.न.३४ या ठिकाणी २० KL क्षमतेचा लिचेट टिट्रिमेंट प्लॅटं विकसित करणे व दोन वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत करीता Tender ID-२०२२-ANMC-७५५०३३-१ अन्वये फेर Exprssion of Interest च्या अनुषंगाने Global Enviros Mumbai यांनी वाटाघाटी नंतर नमुद केलेल्या दरास प्रशासनाने दोन वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केले आहे.परंतु महानगरपालिकेकडे तांत्रिक मनुष्यबळ नसल्याने सदरचा प्रकल्प आणखी तीन वर्षा करीता याच संस्थेला देण्यात येवून एकुण पाच वर्षा करीता प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे करीता देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका, प्रकल्प विभाग, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स.न.३४ या ठिकाणी २० KL क्षमतेचा लिचेट टिट्रिमेंट प्लॅटं विकसित करणे व दोन वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत करीता Tender ID-२०२२-ANMC-७५५०३३-१ अन्वये फेर Exprssion of Interest च्या अनुषंगाने Global Enviros Mumbai यांनी वाटाघाटी नंतर नमुद केलेल्या दरास प्रशासनाने दोन वर्षा करीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केले आहे.परंतु महानगरपालिकेकडे तांत्रिक मनुष्यबळ नसल्याने सदरचा प्रकल्प आणखी तीन वर्षा करीता याच संस्थेला देण्यात येवून एकुण पाच वर्षा करीता प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे करीता देण्यास ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**विषय क्रमांक : ०७** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियांन (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Constrution & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे ,चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे या कामासाठी खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे बाबत Tender ID२०२२ ANMC७५६१७७-१ मधील प्राप्त दरा बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

संदर्भ:- १) इकडील जा..क्र. ४१६ दिनांक ०२/०३/२०२२ चे पत्र

२) दिनांक ०३/०३/२०२२ रोजीची वाटाघाटी.

३) गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांचे दि. ०३/०३/२०२२ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स. नं. २८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे, चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे बाबत Tender ID_2022_ ANMC_756177_1 अन्वये ई- निविदा मागविण्यात आली आहे.

या कामासाठी खालील तक्त्यात नमूद ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. तीनही निविदाकाराने आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने मा.उपायुक्त (कर) यांचे मंजुरीने त्यांचा व्यापारी लिफाफा दिनांक २४/०२/२०२२ रोजी उघडण्यात आला त्याचे विश्लेषण खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेमध्ये नमुद केलेले दर |
|---|---|---|
| १ | गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड | अ) प्रकल्प उभारणे (३० % जादा १८ % जीएसटीसह)<br>**रु.४,७६,४१,०४९.५२८**<br>ब) ५ वर्षांकरीता प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे<br>**पृष्ठ क्र.- ३६० वर तक्ता जोडला आहे.** |
| २ | अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर, नांदेड | अ) प्रकल्प उभारणे (३५ % जादा १८% जीएसटीसह)<br>**रु.४,९४,७३,३९७.५८६**<br>ब) ५ वर्षांकरीता प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे<br>**पृष्ठ क्र.- ३५६ वर तक्ता जोडला आहे.** |
| ३ | जांगिड ब्रदर्स डेव्हलपर्स ॲण्ड इंजिनियर्स | अ) प्रकल्प उभारणे<br>(४० % जादा १८% जीएसटीसह)<br>**रु. ५,१३,०५,७४५.६४५**<br>ब) ५ वर्षांकरीता प्रकल्प चालविणे व<br>देखभाल दुरुस्ती करणे<br>**पृष्ठ क्र.- ३५२ वर तक्ता जोडला** |

त्यानुसार या कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागर JMA Engineering Services, Navi Mumbai यांना संदर्भ क्र. १ अन्वये वरील तीनही निविदाकारांच्या व्यापारी लिफाफ्यामधील दरांचे मुल्यांकन करुन स्वयंस्पष्ट अभिप्राय देणे बाबत कळविण्यात आले होते. संदर्भ क्र. २ अन्वयेच्या ई-मेल द्वारे JMA Engineering Services, Navi Mumbai यांनी कळविलेनुसार गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांनी सादर केलेले दर सर्वात कमीचे असुन अंदाजपत्रकीय रक्कमेच्या तुलनेत जास्तीचे असल्या कारणाने संबंधितांना वाटाघाटीसाठी बोलविणे बाबत सुचित केले होते.

पीएमसीचे अभिप्रायानुसार गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांना दिनांक ०३/०३/२०२२ रोजी मा. उपायुक्त (कर) यांचेकडेस वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. त्यानुसार गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांनी वाटाघाटी झाली सदरचे काम हे निविदेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार म्हणजेच रु. ३,६६,४६,९६१/- या प्रमाणे करुन जीएसटी अतिरिक्त देण्यात येईल असे सुचित करण्यात आले. परंतु गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड मनपाने सुचिविलेल्या दराप्रमाणे काम करणेस असमर्थता दर्शविली.

भविष्यात सद्यस्थितीत स्टील, सिमेंट व इंधनाचे दर वाढणार असल्याने सदरचे काम हे ३०% दराने करणेस परवानगी द्यावी असे नमुद केले. परंतु सदरचा देकार जास्तीचा असल्याने तसे करणे शक्य नसल्याचे शाखा अभियंता यांनी सांगितले. प्रकल्प उभारणे, ५ वर्षाकरीता चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे याबाबतचे दर कमी करणेसाठी पुनश्च सुचित करण्यात आले. त्यासही ठेकेदार एजन्सीने सहमती दर्शविली नाही.

वाटाघाटी अंती कामाचा अंतिम देकार लेखी स्वरुपात देणे बाबत ठेकेदारास सुचित करण्यात आले. त्यानुसार गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांचे संदर्भिय पत्र क्र. ३ प्राप्त झाले असुन खालील प्रमाणे काम करणेस तयार असलेचे कळविले आहे.

| तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा अंतिम देकार | जीएसटी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| प्रकल्प उभारणे | रु. ३,६६,४६,९६१/-<br>जीएसटी व्यतीरिक्त | ५.१६% जादा<br>रु. ३,८५,४०,०००/- | १८ %<br>रु.८४,६०,०००/- | रु. ४,७०,००,०००/- |
| ५ वर्षा करीता प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे | सदरचे दर ठेकेदारामार्फत मागविण्यात आले. | ५ वर्षाकरीता सरासरी दर रु.१२२०/- प्रति टन | जीएसटी लागु नाही. | रु. १२२०/- प्रति टन |

करीता गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांचे संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये सादर केलेले दर पहाता खालील प्रमाणे बाबी विचारात घेणे आवश्यक वाटते.

१) प्रकल्प उभारणे कामी ठेकेदार एजन्सीने वरील नमुद तक्त्यामध्ये सादर केलेला देकार मंजुर करणेसाठी सादर करणेस.

२) भविष्यात कुठल्याही साहित्यांचे दर वाढ झाल्यास निविदेमध्ये अंतिम झालेल्या दरांमध्ये कुठलही वाढ करता येणार नाही.

३) प्रकल्प उभारणेच्या अनुषंगाने १८% जीएसटी आहे यामध्ये भविष्यात वाढ झाल्यास त्यापोटी कुठलीही अतिरिक्त रक्कम अदा करता येणार नाही.

४) प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी जीएसटी लागु नाही. परंतु भविष्यात शासनाने यासाठी जीएसटी लागु केल्यास मनपाकडुन जीएसटी अदा करता येणार नाही.

५) प्रकल्प चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठीचे दर पृष्ठ क्र. याप्रमाणे अपेक्षित होते. परंतु ठेकेदार एजन्सीने सरासरी करुन सुधारीत रु. १२२०/- प्रति टन इतका देकार दिला आहे. प्रकल्पाच्या क्षमते पेक्षा कमी Raw Material उपलब्ध झाल्यास ठेकेदाराची कुठलीही सबब विचारात न घेता तेवढेच देयक अदा करणे संयुक्तीक राहील.

सावेडी स. नं. २८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे, चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांनी वाटाघाटी नंतर वरील प्रमाणे नमुद केलेल्या दरास मंजुरीचे अधिकार मा. स्थायी समिती यांना असल्याने पुढील निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव मा .स्थायी समितीकडे सादर करणे उचित राहील. तथापि आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता प्रकल्प विभाग यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,अ) प्रकल्प उभारणे कामी मनपाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ३,६६,४६,९६१/- व वाटाघाटी नंतर ठेकेदाराचा अंतिम देकार ५.१६%जादा रू.३,८५,४०,०००/- इतका होत असून त्यात १८% जी.एस.टी.ची रक्कम रू.८४,६०,०००/- अधिक केली असता रक्कम रू.४,७०,००,०००/- इतका प्रकल्प उभारणीचा खर्च होत आहे.

ब)सदर प्रकल्प उभारणीच्या देकारास मान्यता देणेसाठी स्थायी समितीकडे शिफारस व्हावी.

क) ५ वर्षा करीता प्रकल्प चालविण्याचे दर हे येणा-या input quantities वर अवलंबुन आहेत.ठेकेदाराने (c&d बाबत) दिलेल्या दराबाबत असून वाटाघाटी व्दारे चर्चा करून निर्णय घेण्यासाठी परत स्थायी समितीकडे पाठविणेत येईल तोपर्यत प्रकल्प उभारणीच्या देकारास स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.

अतिरीक्त रक्कम कशातुन दिली जाणार आहे.

मा. फेर सादर,

उपरोक्त विषया बाबत मा. आयुक्त यांनी नमूद केलेल्या मुद्दयांबाबत फेर सादर करण्यात येते की, स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करण्याच्या प्रकल्पाकरीता ४.० कोटी इतक्या रक्कमेस मा. राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर प्रकल्पासाठी वित्तीय आकृतिबंध खालील प्रमाणे.

**१)** वित्तीय आकृतिबंध :- ( रुपये कोटीत)

| **अ. क्र.** | **प्रकल्प क्षमता (TPD)** | **प्रकल्प किंमत** | **केंद्र शासन हिस्सा (प्रकल्प किमतीच्या ३५%)** | **राज्यशासन हिस्सा (प्रकल्प किंमतीच्या २३.३%)** | **नागरी स्थानिक स्वराज्य हिस्सा (४१.७%)** |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५० | ४ | १.४ | ०.९३२ | १.६६८ |

**२)** अहमदनगर महानगरपालिकेस खालील प्रमाणे निधी प्राप्त झाला आहे.

| **अ.क्र.** | **केंद्र शासन ५० %** | **राज्य शासन ५०%** | **एकुण** |
|---|---|---|---|
| १ | ०.७ | ०.४६६९६ | १.६६९६ |

या कामासाठी उपलब्ध निधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा रक्कम, ठेकेदाराचा देकार इत्यादी बाबत खालील प्रमाणे तपशिल आहे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **रक्कम** |
|---|---|---|
| १ | प्रकल्प उभारणी करीता मा. राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता रक्कम | रु. ४.०० कोटी |
| २ | प्रकल्प उभारणी करीता सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम (तांत्रिक मान्यतेनुसार) | रु.४,४८,२१,६२४/- (जीएसटी सह) |
| ३ | प्रकल्प उभारणी करीता (निविदा रक्कम) | रु.३,६६,४६,९६१/- (जीएसटी व्यतीरिक्त ) |

| | | |
|---|---|---|
| ४ | **प्रकल्प उभारणी करीता ठेकेदाराचा अंतिम देकार** | **रु.४,७०,००,०००/- (जीएसटी सह)** |

विषयांकीत कामासाठी रू. ४.७० कोटी इतक्या निधीची आवश्यकता असणार आहे. पैकी केंद्र व राज्य शासना कडून रू. २.३३ कोटी इतका निधी प्राप्त होणार आहे. त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य हिस्सा (मनपा हिस्सा) रक्कम रु.१.६६८ कोटी व या व्यतीरिक्त जादाची रक्कम १८% जीएसटी रु. ७०.०० लक्ष असे एकुण रु.२.३६८ कोटी इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे.

सद्यस्थितीत संदर्भ क्र. ०१ चे शासन निर्णय अन्वये महानगरपालिकेस रू. ४,५८,०१,७४७/- ही बंधनकारक अनुदान प्राप्त झाले आहेत. त्यामुळे यापैकी ५० टक्के रक्कम २,२९,००,८७४/- घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरणे बंधनकारक असल्याने हा निधी विषयांकीत प्रकल्प उभारणे साठीचे नियोजन करणे कामी मा. उपायुक्त (कर) यांनी सूचित केले आहे.

तसेच संदर्भ क्र. ०२ चे शासन निर्णया नुसार **महानगरपालिका** - १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत Non million plus Cities गटातील अनुदानातून घेण्यात येणा-या कामांच्या प्रस्तांवाना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार महानगरपालिकांच्या बाबतीत संबधीत महानगरपालिकेच्या आयुक्तांना असतील.

करिता

१.विषयांकीत कामासाठी प्रकल्प उभारणे कामी मा. केंद्र व राज्यशासनाच्या अनुदान व्यतिरिक्त मनपा हिस्सा व अतिरिक्त लागणारी रक्कम असे एकूण रू. २.३६८ कोटी पैकी रू. २.२९ कोटी इतकी रक्कम १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या बंधनकारक अनुदानातून वापरणेस

२.उर्वरित रू. ७ लक्ष भविष्यात प्राप्त होणा-या अनुदानातून उपलब्ध करून घेणेस आदेशार्थ सविनय सादर येणे प्रमाणे शाखा अभियंता,प्रकल्प विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचा अभिप्राय घ्यावा.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त विषयानुसार सादर करण्यात येते की,१५ व्या वित्त आयोगातुन अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त निधीबाबत बंधनकारक व अबंधनकारक निधीचा तक्ता जोडलेले आहे.त्यानुसार शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्र. एफ.एफ.सी.- २०२०/ प्र.क्र.५६/नवि-४ दि. २८ ऑक्टोंबर २०२० रोजी स्वराज्य संस्था करीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबची कार्यपध्दती निश्चितीच्या मा.शासन निर्णयानुसार सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार अनुक्रमे १ ते ४नुसार प्राप्त Tied Grantsa निधीतुन रक्क्म रू.५,१३,७१,७१६/- बाबत घनकचरा व्यवस्थापन विभागाने कामे प्रस्तावित करून मा.महासभेची मंजूरी घेतली आहे.

त्यानंतर सोबत जोडलेल्या तक्त्यातील अनुक्रमे ५ नुसार मनपा प्राप्त Tied Grantsa निधी रक्कम रू.४,५८,०१,७४७/- दिनांक २८ ऑक्टोबर २०२० रोजी स्वराज्य संस्था करीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दतीनुसार ५० % पाणी पुरवठा व ५०%रक्क्म घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता निधी वापरणे बंधनकारक आहे.त्यानुसार रू.४,५८,०१,७४७/- पैकी ५०% रक्क्म रू.२,२९,००,८७३/- घनकचरा व्यवस्थापन विभागास वापरता येणार आहे.

त्यानुसार सध्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे कचरा संकलन व वाहतुक व प्रक्रियेचे काम खाजगी एजन्सी मार्फत करून घेण्यात येत आहे.त्याकरीता कचरा संकलन व वाहतुक करणेकामी विभागाकडे सध्या दोन महिन्याचे देयक अदा होईल एवढी तरतुद शिल्लक आहे.त्याकरीता कचरा संकलन व वाहतुक करणेकामी सदरील प्राप्त Tied Grantsa निधी लागाणार आहे.व त्याकरीता विभागामार्फत मा.महासभेकडे मंजूरी कामी सादर करण्यात येणार आहे.

तथापी सदरील प्राप्त **Tied Grantsa** निधी रक्कम रू. २,२९,००,८७३/- घनकचरा व्यवस्थापन विभागास लागणार आहे.

सबब प्रस्तावित नुसार माहितीस्तव व पुढील कार्यवाही सविनय सादर.

सोबत १५ व्या वित्त आयोगानुसार प्राप्त निधीचा तक्ता.

यावर शाखा अभियंता,प्रकल्प विभाग यांचा अभिप्राय की,घनकचरा विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार १५ व्या वित्त आयोगाची शिल्लक रक्क्म ही कचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी लागणार आहे.त्यामुळे या विभागाने दि.१८/०३/२०२२ चे प्रस्तावानुसार या प्रकल्पासाठी लागणारी रक्क्म रू.२.३६८ कोटी (मनपा हिस्सा वGST पोटी लागणारी ) ची तरतुद ही भविष्यात प्राप्त होणा-या १५ व्या वित्त आयोगाच्या निधी मधून करणे शक्य आहे व योग्य राहील तथापी प्रकल्पाच्या उभारणीसाठी एजन्सीने दिलेल्या दर मंजुरीकामी व तदनंतर पुढील कार्यवाहीच्या मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,शाखा अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार मान्यतेस्तव सादर,

१.६६ कोटी रू Reliese झाले नंतर प्रकल्पासाठी लागणारी रक्कम तरतुद करता येईल.

O&Mबाबत संबंधित ठेकेदार यांचे सोबत वाटाघाटी करून प्रस्ताव सादर करणेत येईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रस्ताव स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.नं.२८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियांन (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Constrution & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे ,चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे या कामासाठी खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे बाबत Tender ID२०२२ ANMC७५६१७७-१ मधील प्राप्त दरा बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.सभापती साहेब :- प्रकल्पा बाबत मा.विरोधी पक्ष नेते यांनी पत्र दिले आहे का?

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे :- प्रकल्प इतरत्र हलविणे बाबत पत्र दिले आहे.त्यांना आपण उत्तर दिले आहे.

मा.सौ.वंदना ताठे :- सध्या प्रकल्प उभारणी करून कार्यान्वीत करण्यात यावा.भविष्यात नागरीकांना या प्रकल्पामुळे त्रास झाल्यास प्रकल्प इतर ठिकाणी जागा पहाणी करून स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.या कामी होणारा खर्च महानगरपालिकेने करावा.

मा.श्री.गणेश कवडे :- प्रकल्प उभारणी नंतर सदरचा प्रकल्प पाच वर्षा करीता चालविणेच्या दराबाबत याच ठेकेदार संस्थेशी वाटाघाटी करून निश्चीत होणा-या दराचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मान्यते करीता पाठविण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या च्या सावेडी स. नं. २८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत Tender ID२०२२ ANMC७५६१७७-१ मधील गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांच्या बांधकाम व पाडकाम प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे बाबत प्राप्त दरास मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्प उभारणी नंतर सदरचा प्रकल्प पाच वर्षा करीता चालविणेच्या दराबाबत याच ठेकेदार संस्थेशी वाटाघाटी करून निश्चीत होणा-या दराचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मान्यते करीता पाठविण्यात यावा.सदरचा प्रकल्प उभारणी करून कार्यान्वीत करण्यात यावा. भविष्यात नागरीकांना

या प्रकल्पामुळे त्रास झाल्यास प्रकल्प इतर ठिकाणी जागा पहाणी करून स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.या कामी होणारा खर्च महानगरपालिकेने करावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स. नं. २८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे बाबत Tender ID२०२२ ANMC७५६१७७-१ मधील गुरु रामदास कंनस्ट्रक्शन्स, नांदेड यांच्या बांधकाम व पाडकाम प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे बाबत प्राप्त दरास मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्प उभारणी नंतर सदरचा प्रकल्प पाच वर्षा करीता चालविणेच्या दराबाबत याच ठेकेदार संस्थेशी वाटाघाटी करून निश्चीत होणा-या दराचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मान्यते करीता पाठविण्यात यावा.सदरचा प्रकल्प उभारणी करून कार्यान्वीत करण्यात यावा. भविष्यात नागरीकांना या प्रकल्पामुळे त्रास झाल्यास प्रकल्प इतर ठिकाणी जागा पहाणी करून स्थलांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.या कामी होणारा खर्च महानगरपालिकेने करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

**विषय क्रमांक : ०८** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** जिल्हा सहकारी बॅक,स्टेशन रोड येथील मुख्यशाखा ते महात्मा फुले चौकाकडील राशिन देवी मंदीरा पर्यतची जागा पे ॲण्ड पार्क करीता भाडे तत्वावर देणे बाबतची निविदा मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

उपरोक्त विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिकेच्या जिल्हा सहकारी बॅक स्टेशन रोड येथील मुख्य शाखे पासून ते महात्मा फुले चौकाकडील राशिन देवी मंदीरा पर्यत ची जागा पे ॲण्ड पार्क करीता भाडे तत्वावर देणे बाबतची निविदा अर्जाची विक्री दि.२/३/२०२२ ते १०/०३/२०२२ पर्यत होती तसेच सदर निविदा बयाना रक्कम भरून घेवून विक्री दि.११/०३/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत निविदा अर्ज स्विकारण्याची मुदत होती.

सदर मुदतीमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | मा.सहा.संचालक नगररचना यांनी प्रमाणित केलेले दरमहा भाडे | निविदाधारकाने निविदेत नमुद केलेले दरमहाभाडे | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.चेतन शशिकांत अग्रवाल | ३५००/-(कराविरहित) | ३५००/- | २५०००/- |
| २ | श्री.विशाल राजेंद्र कचरे | ३५००/- (कराविरहित) | ३५५०/- | २५०००/- |
| ३ | श्री.योगेश दिलीप खताळ | ३५००/- (कराविरहित) | ३६५०/- | २५०००/- |

वरील विषयांकीत पे ॲण्ड पार्क करिता मुदतीत तीन निविदा अर्ज प्राप्त झाले आहेत त्या पैकी श्री.योगेश दिलीप खताळ ,अहमदनगर या निविदाधारकांनी मा.सहाय्यक संचालक नगररचना मनपा यांनी प्रमाणीत केलेल्या दरमहा भाडे रू.३५००/-पेक्षा जास्त दरमहाभाडे रू.३५००/-देण्याचे निविदा अर्जात नमुद केले आहे.

तरी श्री.योगेश दिलीप खताळ,अहमदनगर यांनी निविदा स्पर्धेत जास्तीत जास्त दरमहाभाडे रू.३६५०/- व अनामत रक्कम रू.२५०००/-देण्याचे नमुद केले आहे.त्यामुळे त्यांची निविदा मंजूर करणेस शिफारस आहे.तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या जिल्हा सहकारी बॅक ,स्टेशन रोड येथील मुख्यशाखे पासुन ते महात्मा फुले चौकाकडील राशिन देवी मंदीरा पर्यतची मा.सहाय्यक संचालक नगररचना मनपा यांनी निश्चीत केलेल्या पे ॲण्ड पार्कचे क्षेत्र ५०.०० मी इतके असुन त्याचे दरमहा भाडे रू.३६५०/-(करविरहीत) घेवून दरवर्षी वार्षिक १० % भाडे वाढीनुसार नेहमीच्या व निविदेच्या अटी व शर्ती नुसार तसेच अनामत रक्कम रू.२५०००/-घेवून ३वर्षे कराराने श्री.योगेश दिलीप खताळ ,अहमदनगर यांस भाडयाने देणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समितीसभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- जिल्हा सहकारी बॅंक,स्टेशन रोड येथील मुख्यशाखा ते महात्मा फुले चौकाकडील राशिन देवी मंदीरा पर्यतची जागा पे अॅण्ड पार्क करीता भाडे तत्वावर देणे बाबतची निविदा मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या जिल्हा सहकारी बॅंक ,स्टेशन रोड येथील मुख्यशाखे पासुन ते महात्मा फुले चौकाकडील राशिन देवी मंदीरा पर्यतची जागा पे अॅण्ड पार्क करीता निविदा धारक श्री.योगेश दिलीप खताळ,अहमदनगर यांना दरमहा भाडे रू.३६५०/-(करविरहीत) घेवून दरवर्षी वार्षिक १० % भाडे वाढीनुसार नेहमीच्या व निविदेच्या अटी व शर्ती नुसार तसेच अनामत रक्कम रू.२५०००/- घेवून ३वर्षे कराराने देण्यास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या जिल्हा सहकारी बॅंक ,स्टेशन रोड येथील मुख्यशाखे पासुन ते महात्मा फुले चौकाकडील राशिन देवी मंदीरा पर्यतची जागा पे अॅण्ड पार्क करीता निविदा धारक श्री.योगेश दिलीप खताळ,अहमदनगर यांना दरमहा भाडे रू.३६५०/-(करविरहीत) घेवून दरवर्षी वार्षिक १० % भाडे वाढीनुसार नेहमीच्या व निविदेच्या अटी व शर्ती नुसार तसेच अनामत रक्कम रू.२५०००/- घेवून ३वर्षे कराराने देण्यास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१

**विषय क्रमांक : ०९** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग,कार्यालयीन खर्च ( बाहय यत्रंणा )-सन २०२१-२२ अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल नेमणे-ई.निविदा क्र.७२८९५७ या निविदेच्या मंजुरी बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,उक्त विषयांकीत कामाबाबत खाली नमुदप्रमाणे बाब क्र.१ ते ९ साठी निविदाधारकांसाठी झालेल्या ऑनलाईन बैठकीत मान्यता दिलेली होती.सदर बाबी व निविदाधारक संस्थेचा तपशील खाली नमुदप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| A1 | Project Management Consultant | |
| 1 | Consultancy Services for ditailed structural design of Bridge. | १ सबकक्शन झोन<br>२एरोटाईड इंफ्रा,प्रा.ली.<br>३मानवसेवा कन्सल्टंट<br>४यश इनोव्हेटीव्ह<br>५ ं स्ट्रामा कन्सल्टंसी<br>६अविष्कार ग्रुप<br>७टेक्नोजेम कन्सल्टंसी<br>८स्पॅनेक्स एईसी<br>९एच आर एस ॲण्ड असो.<br>१० स्पॅनेक्स एईसी |
| 2 | D.P.R.and Supervision for road , bridges,flyovers,RUB adn ROB projects | १ सबडक्शन झोन<br>२एरोटाईड इंफ्रा,प्रा.ली.<br>३द निसर्ग कन्सल्टंसी<br>४ यश इनोव्हेटीव्ह<br>५ कंस्ट्रमा कन्सल्टंसी<br>६ टेक्नोजेम कन्सटंसी<br>७ एच आर एस ॲण्ड असो. |
| 3 | D.P.R.and Supervision for Water Supply and Sewerage\ Storm Water | १द निसर्ग कन्सल्टंसी<br>२ यश इनोव्हेटीव्ह<br>३ ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रा. |
| 4 | Consultant for Landscape Architectural works | १ अविष्कार ग्रुप<br>२ स्पॅनेक्स एईसी |

| | | |
|---|---|---|
| 5 | Consultants for Green building planning and Designing | १ यश इनोव्हेटीव्ह<br>२ अविष्कार ग्रुप<br>३ टेक्नोजेम कन्सटंसी<br>४ स्पॅनेक्स एईसी<br>५ एच आर एस ॲण्ड असो. |
| 6 | Consultancy services for detailed structural designs of building project | १ सबडक्शन झोन<br>२ मानवसेवा कन्सल्टंट<br>३ यश इनोव्हेटीव्ह<br>४ अविष्कार ग्रुप<br>५ टेक्नोजेम कन्सटंसी<br>६ स्पॅनेक्स एईसी<br>७ ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रा. |
| 7 | Structural Audit of building | १ सबडक्शन झोन<br>२  स्पॅनेक्स एईसी |
| 8 | Consultant ofr Gardening and Horticulture | १ मानवसेवा कन्सल्टंट<br>२ अविष्कार ग्रुप |
| 9 | River Front Development and Beatification work | १ मानवसेवा कन्सल्टंट<br>२ द निसर्ग कन्सल्टंसी<br>३ अविष्कार ग्रुप |

उक्त विषयांकित कामाबाबत कमी दराच्या निविदाधारकांना दिलेल्या दराबाबत विचारणा केली त्यानुसार त्यांनी सदर बाबीसाठभ् काम करणेस व प्रकल्प किंमतीचा दर कळविला आहे.त्यानुसार अहवाल सादर करण्यात येत आहे.

१)एअरोटाईड इंफ्रास्ट्रक्चर इंजि.प्रा.लि.डोबिवली.

अ.क्र.१,२ व ५ बाबत आलेल्या दराबाबत एअरोटाईड इफ्रास्ट्रक्चर इजि.प्रा.लि. याना चर्चे साठी बोलविणेत आले.त्याचेबरोबर झालेल्या चर्चेनुसार त्यानी खाली नमुदप्रमाणे प्रकल्प किमतीप्रमाणे काम करणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

| Project Construction Cost | Design Consultancy Fee |
|---|---|
| 100 Cr.& abpve | 0.60% |
| 50  Cr & 99Cr. | 1.00% |
| 25Cr tp 49 Cr. | 1.5% |
| Below 25 Cr. | 02.00% |

२ )सबडक्शन झोन ,पुणे

अ.क्र.१,२,६ व ७ चे कामाबाबत प्रकल्प किंमतीच्या १.७५ % दराने काम करणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

३)मानवसेवा कन्सल्टंट ,धुळे

अ.क्र.१,६,८ व ९ चे कामाबाबत प्रकल्प किंमतीच्या १.९७ % दराने काम करणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

४)द निसर्ग कन्सल्टंसी ,नाशिक

अ.क्र.२,३,व ९ चे कामाबाबत शासन निर्णक क्र.संकिर्ण -२०१८ /प्र.क्र.५४/नवि-१६ दि.४ जून २०१८ नुसार म्हणजे प्रकल्प किंमतीच्या २.०० % दराने काम करणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

५) स्पॅनेक्स एईसी,सोल्युशन्स प्रा.ली.

अ.क्र.१,४,५,६ व ७ चे कामाबाबत प्रकल्प किंमतीच्या १.७० % दराने काम करणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

उक्त सर्व १ ते ९ च्या विविध स्वरूपाच्या कामांसाठी प्रकल्प किंमतीच्या १.७०% प्रमाणे दर मंजूर करणेस व त्यानुसार पॅनेल तयार करणेस्तव सदरचा अहवाल मा.स्थायी समितीकडेस मान्यतेसाठी सादर करणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,मा.सादर,वरील "अ" प्रमाणे पुढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मा.लेखापिरीक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केले नुसार तसेच शहर अभियंता यांचे अभिप्राय प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समितीसभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग,कार्यालयीन खर्च ( बाहय यत्रंणा )-सन २०२१-२२ अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल नेमणे-ई.निविदा क्र.७२८९५७ या निविदेच्या मंजुरी बाबत ऑफीस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पअुलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- विषयाची सविस्तर माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.इथापे :- महानगरपालिकेच्या बांधकाम विभागांमार्फत विविध कामे प्रस्तावित केली जातात. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल नेमणे करीता ई - निविदा क्र.७२८९५७ प्रसिध्द केली हाती. यातील १ ते ९ च्या विविध स्वरूपाच्या कामांसाठी प्रकल्प किंमतीच्या १.७०% प्रमाणे दर मंजूर करणेस व त्यानुसार पॅनेल तयार करणेस्तव सदरचा अहवाल मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव ठेवण्यात आलेला आहे.

मा.सभापती साहेब :- हा पॅनल तयार झाल्यावर आपण त्यांना कोणती कामे देणार आहे?

शहर अभियंता श्री.इथापे :- एखादया संस्थेला आपण काम दिल्यानंतर त्या संस्थेची प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे,सर्व्हेक्षण करणे,निधी उपलब्ध करणे इ.स्वरूपाचे कामे त्यांच्याकडून आपल्याला करून घेता येईल.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद १ ते ९ च्या विविध स्वरूपाच्या कामांसाठी प्रकल्प किंमतीच्या १.७०% प्रमाणे दरास व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल नेमणूक करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार प्रस्तावित बांधकाम विभागाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल नेमणे करीता ई - निविदा क्र.७२८९५७ मधील १ ते ९ च्या विविध स्वरूपाच्या कामांसाठी प्रकल्प किंमतीच्या १.७०% प्रमाणे दरास व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल नेमणूक करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

**विषय क्रमांक : १०** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्र.९ मधील सर्जेपुरा हरीजनवस्ती (गाव खाते) येथील जुने सभागृह CTS No ७१८९ पाडणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग

संदर्भ :- १.मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडीलक भोसले,यांचे १५२ दि.४/२/२०२२

२.माजी नगरसेवक श्री.शेख अरीफ रफियोद्दीन यांचे दि.४/२/२०२२ चे पत्र

३.इकडील पत्र जा.क्र.बांधकाम २७४२ दि.१७/०२/२०२२ चे पत्र.

४. श्री.वैभव फिरोदीया यांचा दि.२३/१२/२०२२ चा स्ट्रक्चर ऑडिट रिपोर्ट.

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर करण्यात येते की,मा.उपमहापौर यांचे पत्रानुसार समक्ष पहाणी केली असता सदरची वास्तु तत्कालीन नगरपालिका काळामध्ये म्हणजे एकीव माहितीनुसार तत्कालीन आमदार श्री.दादाभाउ कळमकर यांचे निधीतुन अंदाजे १९८० सालचे दरम्यान बांधले बाबत स्थानिक नागरीकांनी माहिती दिली.सदर वास्तु रंबभुवन,सर्जेपुरा मागील भागातील झोपडपट्टी मध्ये असलेल्या मोकळया जागेत आहे.सदर आयताकृती बांधकाम आर.सी.सी.प्रकारातील व Truss व त्यावर पत्रे व बाजुचे विट बांधकामाखाली शहाबादी फरशी व बाजुस काचा नसलेल्या लोखंडी खिडकी व इमारतीचे छत ४ Truss व त्यावर GI प्रकारातील पत्रे व इमारतीच्या बाजुने पेव्हिंग ब्लॉक व मोकळया भुखंडाला दगडी विट बांधकाम अशी वास्तु आहे.सदर इमारतीस एक उंबराचे झाड असून झाडाखाली गुरूदत्ताचे ६x६ " अंदाजे आकाराचे मंदिर आहे व सदरचा भाग जादा दाट लोकवस्तीच्या मध्ये ठिकाणी आहे.इमारतीस व-याच ठिकाणी भिंतींना तडे गेलेले आहेत.

तसेच संदर्भ क्र.४ नुसार महानगरपालिकेच्या पॅनल वरील स्ट्रक्चर ऑडीटर श्री.वैभव फिरोदिया यांनी प्रत्यक्षदर्शी अहवालाचा निष्कर्ष दिलेला आहे की,सदरची इमारत दुरूस्तीच्या पलीकडे व मनुष्य रहीवासास अयोग्य आहे.त्यामुळे सदर इमारत सी-१ (अतिधोकादायक,रहण्या अयोग्य व तात्काळ निष्कसित करणे प्रवर्गामध्ये नुसार प्रकारातील मोडणा-या ) असल्याने इमारत जमिनदोस्त करणे आवश्यक आहे.परंतु सदरची वास्तु व दगड मातीची असल्याने प्रथम निर्लेखनासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.व निर्लेखन मंजूरी नंतर त्या जागेवर करावयाच्या बांधकामाचे अंदाजपत्रकामध्ये इमारत पाडण्याचे तरतुद करणे योग्य होईल.

तरी सदर इमारत निर्लेखित करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे मा.स्थायी समिती समोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) प्रस्तावित "अ" नुसार कार्यवाही करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रस्ताव स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र.९ मधील सर्जेपुरा हरीजनवस्ती (गाव खाते) येथील जुने सभागृह CTS No ७१८९ पाडणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबत माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.इथापे :- प्रभाग क्र.९ मधील सर्जेपुरा हरीजनवस्ती मधील अंदाजे १९८० सालचे दरम्यान सभागृह बांधण्यात आले होते.सध्या ही इमारत मोडकळीस आलेली आहे. महानगरपालिकेच्या पॅनल वरील स्ट्रक्चर ऑडीटर श्री.वैभव फिरोदिया यांनी प्रत्यक्षदर्शी अहवालाचा निष्कर्ष दिलेला आहे की,सदरची इमारत दुरूस्तीच्या पलीकडे व मनुष्य रहीवासास अयोग्य असल्याने इमारत जमिनदोस्त करणे आवश्यक आहे.प्रथम निर्लेखनासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- या ठिकाणी दत्त मंदिर आहे का ?

शहर अभियंता श्री.इथापे :- सभागृहाच्या बाजुला आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- मंदिरास बाधा न येता सभागृह पाडण्यात यावे.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र.९ मधील सर्जेपुरा हरीजनवस्ती (गाव खाते) येथील जुने सभागृह CTS No ७१८९ पाडणे बाबत महानगरपालिकेच्या पॅनल वरील स्ट्रक्चर ऑडीटर श्री.वैभव फिरोदिया यांनी प्रत्यक्षदर्शी अहवालाचा निष्कर्ष दिलेला आहे की,सदरची इमारत दुरूस्तीच्या पलीकडे व मनुष्य रहीवासास अयोग्य आहे.त्यामुळे सदर इमारत अतिधोकादायक,रहण्या अयोग्य व तात्काळ निष्कसित करणे प्रवर्गामधील असल्याने इमारत पाडण्यास व निर्लेखन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

ठराव :- ऑफिस रिपोर्ट नुसार प्रभाग क्र.९ मधील सर्जेपुरा हरीजनवस्ती (गाव खाते) येथील जुने सभागृह CTS No ७१८९ पाडणे बाबत महानगरपालिकेच्या पॅनल वरील स्ट्रक्चर ऑडीटर श्री.वैभव फिरोदिया यांनी प्रत्यक्षदर्शी अहवालाचा निष्कर्ष दिलेला आहे की,सदरची इमारत दुरूस्तीच्या पलीकडे व मनुष्य रहीवासास अयोग्य आहे.त्यामुळे सदर इमारत अतिधोकादायक,रहण्या अयोग्य व तात्काळ निष्कसित करणे प्रवर्गामधील असल्याने इमारत पाडण्यास व निर्लेखन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०१**

**विषय क्रमांक : ११** **दिनांक :- १८/०४/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कारारनुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता ( मेकॅनिकल ) व ( सिव्हील ) या पदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता कारारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. पाणी पुरवठा विभाग १३७५ दि. १६/०२/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये " पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची दि. ११/०९/२०२१ ते १०/०३/२०२२ अखेर असुन त्यांची मुदत दि. ११/०३/२०२२ पासुन समाप्त होत असल्याने व तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदी १) राहुल सदाशिव गिते २) प्रदिप सदाशिव ढगे यांची दि. २५/०९/२०२१ ते २४/०३/२०२२ अखेर असुन त्यांची मुदत दि. २५/०३/२०२२ पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा. स्थायी समिती ठराव क्रं. ६९ दिनांक ०३/०९/२०२१ अन्वये पुर्व मंजुरी पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ३५४५ दि. १५/११/२०२१ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी स्नेहल राजेंद्र मुळे यांची रु. २५,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. ११/०९/२०२१ पासुन सहा महिन्याकरीता व जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ३५४६ दि. १५/११/२०२१ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदी १) राहुल सदाशिव गिते २) प्रदिप सदाशिव ढगे यांची रु. २५,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. २५/०९/२०२१ पासून सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील श्रीमती मुळे यांची नियुक्तीची मुदत दि. ११/०३/२०२२ रोजी पासुन समाप्त होणार असून श्री. गिते व ढगे यांची दि. २५/०३/२०२२ रोजी पासून नियुक्ती मुदत ही समाप्त होणार आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) स्नेहल राजेंद्र मुळे २) राहुल सदाशिव गिते ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मेकॅनिकल) यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २५,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणेकरिता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.२००५/प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/०८/२००५ मधील परि-०५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्यात यावी,अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यावर त्या विहीत वेळेत

संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी.प्रस्तावित कनिष्ठ अभियंता या पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन करून उचित कार्यवाही करावी.

यावर सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मुख्यलेखाधिकारी व अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय नुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार आदेशार्थ सादर.

यावर अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार मा.स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कारारनुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता ( मेकॅनिकल ) व ( सिव्हील ) या पदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता कारारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफीस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- कोणत्या विभागामध्ये हे कर्मचारी काम करतात,त्यांचे काम चांगले आहे का?

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- पाणी पुरवठा विभागामध्ये काम करतात.व्यवस्थीत काम करतात.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.मोटार व्हेईकल विभागातील मधील मानधनावरील कर्मचारी श्री.स्वप्निल पवार यांना पुर्ननियुक्ती बाबतचा विषयाला याच सभेमध्ये मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.परसराम गायकवाड :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.स्थायी समितीकडे सभेचा अजेंडा निघाल्यानंतर मानधनावरील कर्मचारी यांची पुर्ननियुक्ती बाबतचा प्रस्ताव आलेला असल्याने अजेंडयावर विषय घेता आलेला नाही.त्यामुळे याच सभेमध्ये मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) स्नेहल राजेंद्र मुळे २) राहुल सदाशिव गिते ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मेकॅनिकल) यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास व श्री.स्वप्नील पवार,मोटार व्हेईकल विभाग मानधनावरील कर्मचारी यांची पुर्ननियुक्ती बाबत प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार १) स्नेहल राजेंद्र मुळे २) राहुल सदाशिव गिते ३) प्रदिप सदाशिव ढगे यांची तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मेकॅनिकल) यापदी तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास व श्री.स्वप्नील पवार,मोटार व्हेईकल विभाग मानधनावरील कर्मचारी यांची पुर्ननियुक्ती बाबत प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

अनुमोदक :- मा.श्री.परसराम गायकवाड सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका